# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## भूगोल विभाग

लोकमत

राजगुरु महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण : १२ तासांत साडेबेचाळीस हजार वाहनांची ये-जा

# पुणे-नाशिक महामार्ग प्रचंड वर्दळीचा

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान विभाग आणि पुणे येथील उष्णकटिबंधीय मौसम विज्ञान संस्था यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पुणे शहराला जोडणाऱ्या प्रमुख राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या उपनगरांमध्ये हवेच्या प्रदूषणाची पातळी मोजण्यासाठी, तसेच वाहतुकीच्या समस्येचे गांभीर्य लक्षात येण्यासाठी आय.आय.टी.एम. पुणे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या माध्यमातून राजगुरुनगर शहरामध्ये पुणे-नाशिक महामार्गावरुन जाणाऱ्या-येणाऱ्या वाहनांची संख्या मोजून ट्रॅफिक सर्व्हे करण्यात आला.



हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या माध्यमातून राजगुरुनगर शहरामध्ये पुणे-नाशिक महामार्गावरुन जाणाऱ्या-येणाऱ्या वाहनांची संख्या मोजताना विद्यार्थी.

झालेल्या सर्व्हेत सकाळी ७ ते सायंकाळी ७ पर्यंतच्या १२ तासांमध्ये दुचाकी, चारचाकी, स्कूल बस, प्रवासी बस, मालवाहतूक करणारे छोटी आणि मोठी वाहने, इतर वाहने आणि इतर राज्यातून येणारी वाहने असे वाहनांचे सर्व प्रकार मोजता राजगुरु महाविद्यालयासमोरुन सुमारे ४२ हजार ४७५ वाहनांनी ये-जा केल्याचे दिसून आल्याने हा महामार्ग प्रचंड वर्दळीचा असल्याचे उघड झाले. क्लिक काऊंटर या मोबाईल ॲप्सचा उपयोग करून विद्यार्थ्यांनी हा सर्व्हे केला.

याशिवाय विद्यार्थ्यांनी राजगुरुनगर परिसरातील प्रदूषणाची पातळी मोजण्यासाठी म्हणून हॉस्पिटल, हॉटेल, वीटभट्ट्या, पथारीवाले, प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचे ड्रायव्हर, इतर दुचाकी-चारचाकी वाहनांचे ड्रायव्हर, घरामध्ये होणारे इंधनाचे ज्वलन यासंदर्भात प्रत्यक्ष भेट घेऊन सर्वेक्षणाचे काम केले. पुणे शहर व उपनगरे यामध्ये वाहतुकीच्या साधनांद्वारे सर्वाधिक प्रदूषण होत असते, हे प्रदूषण टाळण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करता येऊ शकतात, याचा आढावा घेण्यात आला.

आ.आय.टी.एम. या संस्थेचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. गुफरान बेग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुरेश गोसावी तसेच प्रोजेक्ट सुपरवायझर डॉ. प्रमोद कांबळे, डॉ. उत्कर्ष मुक्कनवार यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या सर्वेक्षणाचे नियोजन प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, भूगोल विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळूक, तसेच प्रा.मच्छिंद्र मुळुक, प्रा. दादासाहेब मारकड आणि भूगोल विभागातील सुमारे २२ विद्यार्थ्यांनी केले.

### पुणे महानगराच्या नियोजनासाठी सर्व्हे उपयुक्त

- भूगोल विभागप्रमुख प्रा. दिलीप मुळुक यांनी विविध प्रकारच्या वाहनांतील इंधनाच्या ज्वलनातून होणाऱ्या प्रदूषणाची पातळी मोजणे हा या सर्वेक्षणाचा हेतू असल्याचे सांगताना या महामार्गावरुन जाणाऱ्या वाहनांची संख्या ही चाळीस हजारांहून अधिक असल्यामुळे भविष्यकाळात विकसित होत असणाऱ्या पुणे महानगराच्या नियोजनासाठी हा सर्व्हे अतिशय उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले.
- वाहतुकीसाठी रस्ते अपुरे पडत असताना भविष्यकाळात रस्त्याशिवाय वाहतुकीच्या इतर प्रकारांची आवश्यकता असल्याचे या सर्वेक्षणाच्या निमित्ताने दिसून आल्याचे ते म्हणाले.
- १२ तासांमध्ये पुणे-नाशिक महामार्गावरुन एकूण ४२,४७५ वाहने गेल्याचे निदर्शनास आले. (पैकी दुचाकी वाहनांची संख्या २३०३८, ऑटो रिक्षा ७००, चारचाकी खासगी आणि प्रवासी वाहने ११९८२, छोटी मालवाहतूक करणारे वाहने १६६४, अवजड मालाची वाहतूक करणारी वाहने २१०१, स्कूल बस ६१, प्रवासी वाहतूक करणाऱ्या बस १६५३, ट्रॅक्टर-टँकर जेसीबी यासारखी वाहने २५९, आणि इतर राज्यातून आलेली वाहने १०१७)

# पुणे-नाशिक महामार्ग प्रचंड वर्दळीचा

## हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केला सर्व्हे

**राजगुरूनगर, दि. ४ (प्रतिनिधी)** - येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी येथे २९ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ७ पर्यंतच्या १२ तासांमध्ये दुचाकी, चारचाकी, स्कूल बस, प्रवासी बस, मालवाहतूक करणारे छोटी आणि मोठी वाहने, इतर वाहने आणि इतर राज्यातून येणाऱ्या वाहनांचे सर्व प्रकार मोजता राजगुरू महाविद्यालयासमोरून सुमारे ४२ हजार ४७५ वाहनांनी ये-जा केल्याचे दिसून आल्याने हा महामार्ग प्रचंड वर्दळीचा असल्याचे उघड झाले. क्लिक काऊंटर या मोबाईल ॲपचाचा उपयोग करून विद्यार्थ्यांनी हा सर्व्हे केला.




**राजगुरूनगर : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पुणे-नाशिक महामार्गावरून जाणाऱ्या सर्वप्रकाराच्या वाहनांचे एकदिवसीय सर्वेक्षण केले.**

भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान विभाग आणि पुणे येथील उष्णकटिबंधीय मौसम विज्ञान संस्था यांचा मार्गदर्शक सूचनांनुसार पुणे शहराला जोडणाऱ्या प्रमुख राष्ट्रीय महामार्गांवर असलेल्या उपनगरांमध्ये हवेच्या प्रदूषणाची पातळी मोजण्यासाठी तसेच वाहतुकीच्या समस्येचे गांभीर्य लक्षात येण्यासाठी आयआयटीएम पुणे, आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पर्यावरण शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या माध्यमातून राजगुरुनगर शहरामध्ये पुणे-नाशिक महामार्गावरून जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांची संख्या मोजून ट्रॅफिक सर्वे करण्यात आला.

या शिवाय विद्यार्थ्यांनी राजगुरुनगर परिसरातील प्रदूषणाची पातळी मोजण्यासाठी म्हणून हॉस्पिटल, हॉटेल, वीटभट्ट्या, पथारी वाले, प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचे ड्रायव्हर, इतर दुचाकी-चारचाकी वाहनांचे ड्रायव्हर, घरामध्ये होणारे इंधनाचे ज्वलन यासंदर्भात प्रत्यक्ष भेट घेऊन सर्वेक्षणाचे काम केले. पुणे शहर व उपनगरे यामध्ये वाहतुकीच्या साधनांद्वारे सर्वाधिक प्रदूषण होत असते हे प्रदूषण टाळण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करता येऊ शकतात याचा आढावा घेण्यात आला.

आयआयटीएम या संस्थेचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. गुफरान बेग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुरेश गोसावी तसेच प्रोजेक्ट सुपरवायझर डॉ. प्रमोद कांबळे, डॉ. उत्कर्ष मुक्कनवार यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या सर्वेक्षणाचे नियोजन प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, भूगोल विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळूक तसेच प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. दादासाहेब मारकड आणि भूगोल विभागातील सुमारे २२ विद्यार्थ्यांनी केले.

### १२ तासांत ४२ हजार ४७५ वाहने

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या सर्वेक्षणात १२ तासांमध्ये पुणे नाशिक महामार्गावरून एकूण ४२हजार ४७५ वाहने गेल्याचे निदर्शनास आले. (पैकी दुचाकी वाहनांची संख्या २३०३८, ऑटो रिक्षा ७००, चार चाकी खासगी आणि प्रवासी वाहने ११९८२, छोटी मालवाहतूक करणारे वाहने १६६४, अवजड मालाची वाहतूक करणारी वाहने २१०१, स्कूलबस ६१, प्रवासी वाहतूक करणाऱ्या बस १६५३, ट्रॅक्टर-टँकर-जेसीबी यांसारखी वाहने २५९ आणि इतर राज्यातून आलेली वाहने १०१७.

“ विविध प्रकारच्या वाहनांतील इंधनाच्या ज्वलनातून होणाऱ्या प्रदूषणाची पातळी मोजणे हा या सर्वेक्षणाचा हेतू आहे. हामार्गावरून जाणाऱ्या वाहनांची संख्या ही ४० हजारांहून अधिक असल्यामुळे भविष्यकाळात विकसित होत असणाऱ्या पुणे महानगराच्या नियोजनासाठी हा सर्वे अतिशय उपयुक्त ठरणार आहे. वाहतुकीसाठी रस्ते अपुरे पडत असताना भविष्यकाळात रस्त्याशिवाय वाहतुकीच्या इतर प्रकारांची आवश्यकता असल्याचे या सर्वेक्षणाच्या निमित्ताने दिसून येते.

–**प्रा. दिलीप मुळूक,** भूगोल विभाग प्रमुख



# पुणे-नाशिक महामार्गावरील वर्दळीचे सर्वेक्षण

## हवेच्या प्रदूषणाची पातळी मोजली; धावली चाळीस हजारांपेक्षा अधिक वाहने

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

पुणे शहराला जोडणाऱ्या प्रमुख राष्ट्रीय महामार्गांवर असलेल्या उपनगरांमध्ये हवेच्या प्रदूषणाची पातळी मोजण्यासाठी, तसेच वाहतुकीच्या समस्येचे गांभीर्य लक्षात येण्यासाठी आय.आय. टी.एम. पुणे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पर्यावरण शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या माध्यमातून राजगुरुनगर शहरामध्ये पुणे-नाशिक महामार्गावरील वाहनांची संख्या मोजून नुकताच ट्रॅफिक सर्व्हे करण्यात आला. भारत सरकारचा पृथ्वी विज्ञान विभाग आणि पुणे येथील उष्ण कटिबंधीय मौसम विज्ञान संस्था यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हे सर्वेक्षण करण्यात आले.

२९ फेब्रुवारी रोजी झालेल्या सर्व्हेत सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंतच्या १२ तासांमध्ये दुचाकी, चारचाकी, स्कूल बस, प्रवासी बस, मालवाहतूक करणारी छोटी-मोठी वाहने, इतर वाहने आणि इतर राज्यातून येणारी वाहने मोजता राजगुरू महाविद्यालयासमोरून सुमारे ४२ हजार ४७५ वाहनांनी ये-जा केल्याचे दिसून आले. सर्वेक्षण उपक्रमाद्वारे हा महामार्ग प्रचंड वर्दळीचा असल्याचे उघड झाले. क्लिक काउंटर या मोबाईल ॲपचा उपयोग करून विद्यार्थ्यांनी हा सर्व्हे केला.

याशिवाय विद्यार्थ्यांनी राजगुरुनगर परिसरातील प्रदूषणाची पातळी मोजण्यासाठी हॉस्पिटल, हॉटेल, वीटभट्ट्या, पथारीवाले, प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचे चालक, इतर दुचाकी-चारचाकी वाहनांचे चालक, घरामध्ये होणारे इंधनाचे ज्वलन यासंदर्भात प्रत्यक्ष भेट देऊन सर्वेक्षणाचे काम केले. पुणे शहर व उपनगरे यामध्ये वाहतुकीच्या साधनांद्वारे सर्वाधिक प्रदूषण होत असते. हे प्रदूषण टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येऊ शकतात याचा आढावा घेण्यात आला.

भूगोल विभागप्रमुख प्रा. दिलीप मुळुक यांनी विविध प्रकारच्या वाहनांतील इंधनाच्या ज्वलनातून होणाऱ्या प्रदूषणाची पातळी मोजणे हा या सर्वेक्षणाचा हेतू असल्याचे सांगताना या महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांची संख्या ४० हजारांहून अधिक असल्यामुळे भविष्यकाळात विकसित होत असणाऱ्या पुणे महानगराच्या नियोजनासाठी हा सर्वे अतिशय उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले. वाहतुकीसाठी रस्ते अपुरे पडत असताना भविष्यकाळात रस्त्याशिवाय इतर पर्यायांची आवश्यकता असल्याचे या सर्वेक्षणाच्या निमित्ताने दिसून आल्याचे ते म्हणाले. आय.आय. टी.एम. या संस्थेचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. गुफरान बेग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुरेश गोसावी, तसेच प्रोजेक्ट सुपरवायझर डॉ. प्रमोद कांबळे, डॉ. उत्कर्ष मुक्कनवार यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या सर्वेक्षणाचे नियोजन प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, भूगोल विभागप्रमुख प्रा. दिलीप मुळुक, तसेच प्रा. मच्छिंद्र मुळुक, प्रा. दादासाहेब मारकड आणि भूगोल विभागातील २२ विद्यार्थ्यांनी केले.



**आय.आय.टी.एम. पुणे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पर्यावरण शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजगुरुनगर शहरामध्ये पुणे-नाशिक महामार्गावरील वाहनांची संख्या मोजून नुकताच ट्रॅफिक सर्व्हे करण्यात आला.**

सकाळ

# बारा तासांत ४२ हजार वाहने

## नाशिक महामार्ग वर्दळीचा; विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणातील निष्कर्ष

**राजगुरुनगर, ता. ५ :** पुणे-नाशिक महामार्गावर १२ तासांत ४२ हजार ४७५ वाहनांची ये-जा झाल्याने हा महामार्ग प्रचंड वर्दळीचा असल्याचे स्पष्ट झाले आहे. पुणे येथील उष्णकटिबंधीय मौसम विज्ञान संस्था (आयआयटीएम) आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या सर्वेक्षणातून ही बाब स्पष्ट झाली आहे.

भारत सरकारचा पृथ्वी विज्ञान विभाग आणि पुणे येथील उष्णकटिबंधीय मौसम विज्ञान संस्था यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पुणे शहराला जोडणाऱ्या प्रमुख राष्ट्रीय महामार्गांवर असलेल्या उपनगरांमध्ये हवेच्या प्रदूषणाची पातळी मोजण्यासाठी पान २ वर »




राजगुरुनगर (ता. खेड) : पुणे-नाशिक महामार्गावर वाहतूक सर्वेक्षण करताना हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे विद्यार्थी.

### नियोजनासाठी सर्व्हे अतिशय उपयुक्त ठरणार

वेगाने विकसित होत असणाऱ्या पुणे महानगराच्या नियोजनासाठी हा सर्व्हे अतिशय उपयुक्त ठरणार आहे, असे भूगोल विभागप्रमुख प्रा. दिलीप मुळूक यांनी सांगितले. वाहतुकीसाठी रस्ते अपुरे पडत असताना भविष्यकाळात रस्त्याशिवाय वाहतुकीच्या इतर प्रकारांची आवश्यकता असल्याचे या सर्वेक्षणाच्या निमित्ताने दिसून आल्याचेही त्यांनी सांगितले.

Pune, District-Today
06/03/2020 Page No. 1

सकाळ

# बारा तासांत ४२ हजार वाहने

» पान १ वरून

तसेच वाहतुकीच्या समस्येचे गांभीर्य लक्षात येण्यासाठी हे वाहतूक सर्वेक्षण २९ फेब्रुवारीला करण्यात आले. या सर्वेक्षणात सकाळी ७ ते सायंकाळी ७ पर्यंतच्या १२ तासांमध्ये दुचाकी, चारचाकी, स्कूल बस, प्रवासी बस, मालवाहतूक करणारी छोटी आणि मोठी वाहने असे वाहनांचे सर्व प्रकार मोजण्यात आले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयासमोर "क्लिक काउंटर' या पद्धतीद्वारे हे सर्वेक्षण केले गेले.

याशिवाय विद्यार्थ्यांनी राजगुरुनगर परिसरातील प्रदूषणाची पातळी मोजण्यासाठी हॉस्पिटल, हॉटेल, वीटभट्ट्या, पथारीवाले, दुचाकी-चारचाकी वाहनांचे चालक, घरामध्ये होणारे इंधनाचे ज्वलन यासंदर्भात प्रत्यक्ष भेट घेऊन सर्वेक्षण केले.

आयआयटीएम या संस्थेचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. गुफरान बेग, विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुरेश गोसावी, प्रोजेक्ट सुपरवायझर डॉ. प्रमोद कांबळे, डॉ. उत्कर्ष मुक्कनवार यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या सर्वेक्षणाचे नियोजन प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. दादासाहेब मारकड आणि भूगोल विभागातील सुमारे २२ विद्यार्थ्यांनी केले.

Pune, District-Today
06/03/2020 Page No. 2

तरुणांना घेऊन करण्यात आले.

# पुणे-नाशिक महामार्ग प्रचंड वर्दळीचा

## राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या सर्वेक्षणातून झाले उघड

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान विभाग आणि पुणे येथील उष्णकटिबंधीय मौसम विज्ञान संस्था यांचा मार्गदर्शक सूचनांनुसार पुणे शहराला जोडणाऱ्या प्रमुख राष्ट्रीय महामार्गांवर असलेल्या उपनगरांमध्ये हवेच्या प्रदूषणाची पातळी मोजण्यासाठी तसेच वाहतुकीच्या समस्येचे गांभीर्य लक्षात येण्यासाठी आय.आय.टी.एम. पुणे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पर्यावरण शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या माध्यमातून राजगुरुनगर शहरामध्ये पुणे नाशिक महामार्गावरून जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांची संख्या मोजून ट्राफिक सर्वे करण्यात आला.

या झालेल्या सर्व्हेत सकाळी ७ ते सायंकाळी ७ पर्यंतच्या १२ तासांमध्ये दुचाकी, चारचाकी, स्कूल बस, प्रवासी बस, मालवाहतूक करणारे छोटी आणि मोठी वाहने, इतर वाहने आणि इतर राज्यातून येणारी वाहने असे वाहनांचे सर्व प्रकार मोजता राजगुरू महाविद्यालयासमोरून सुमारे ४२,४७५ वाहनांनी ये-जा केल्याचे दिसून आल्याने हा महामार्ग प्रचंड वर्दळीचा असल्याचे उघड झाले. क्लिक काऊंटर या मोबाईल ॲप्सचा उपयोग करून विद्यार्थ्यांनी हा सर्व्हे केला.

या शिवाय विद्यार्थ्यांनी राजगुरुनगर परिसरातील प्रदूषणाची पातळी मोजण्यासाठी म्हणून हॉस्पिटल, हॉटेल, वीटभट्ट्या, पथारीवाले, प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचे ड्रायव्हर, इतर दुचाकी-चारचाकी वाहनांचे ड्रायव्हर, घरांमध्ये होणारे इंधनाचे ज्वलन यासंदर्भात प्रत्यक्ष भेट घेऊन सर्वेक्षणाचे काम केले. पुणे शहर व उपनगरे यामध्ये वाहतुकीच्या साधनांद्वारे सर्वाधिक प्रदूषण होत असते हे प्रदूषण टाळण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करता येऊ शकतात याचा आढावा घेण्यात आला. आ.आय.टीएम. या संस्थेचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. गुफरान बेग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुरेश गोसावी तसेच प्रोजेक्ट सुपरवायझर डॉ. प्रमोद कांबळे, डॉ. उत्कर्ष मुक्कनवार यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या सर्वेक्षणाचे नियोजन प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, भूगोल विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळूक तसेच प्रा.मच्छिंद्र मुळूक, प्रा. दादासाहेब मारकड आणि भूगोल विभागातील सुमारे २२ विद्यार्थ्यांनी केले

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख